ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २४ फेब्रुवारी, १९५४ अंक ८

## विविध माहिती

**भारत-रुमेनिआ व्यापारी वाटाघाटी**—भारत आणि रुमेनिआ ह्यांच्या दरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यासाठीं रुमेनिआचें व्यापारी-मंडळ नवी दिल्ली येथें येऊन दाखल झालें आहे. आतांपर्यंत उभय देशांत व्यापारी करार नव्हता आणि व्यापारहि बेताचाच होता. रुमेनिआ भारताला यंत्रसामुग्री आणि तेल देऊं शकेल. भारताकडून लाख, कांतडीं व इतर कच्चा माल रुमेनिआला पाहिजे आहे.

**मेट्रोपॉलिटन व्हिकर्सचें रशिअन गिऱ्हाईक**—विजेची यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या ब्रिटिश कारखान्यांत मेट्रोपॉलिटन व्हिकर्स हा कारखाना प्रसिद्ध आहे. ह्या कारखान्यानें युद्धापूर्वी बरेंच यंत्रसाहित्य रशिआला पुरविलेलें आहे. आतां आणखी माल खपविण्यासाठीं कंपनीचे दोन वरिष्ठ अधिकारी मॉस्कोला गेले आहेत.

**स्विट्झरलंडमधील औद्योगिक प्रदर्शन**—स्विट्झरलंडमधील ३८ वें औद्योगिक प्रदर्शन बेसल येथें ता. ८ ते १८ मे पर्यंत भरणार आहे. स्विट्झरलंडमधील २,५०० कारखाने ह्या प्रदर्शनांत आपले गाळे उघडणार आहेत. घड्याळें, कापड, कापडाची यंत्रसामुग्री, विजेचें यंत्रसाहित्य, रसायनें, इत्यादी माल प्रदर्शनांत पाहावयास मिळेल.

**प्रतिदिनीं ५०० रुपयांचा सल्ला**—सिंगापूर सिटी कौन्सिलनें मातीचा बंधारा बांधण्याच्या कामीं सल्ला देण्यासाठीं मि. सॅव्हेज ह्या नांवाच्या एका अमेरिकन तज्ज्ञाला पाचारण केलें आहे. गेल्या वर्षीं ह्याच कामासाठीं सल्ला देण्याबद्दल त्यांना दररोज ४५० रुपये देण्यांत आले होते. चालू वर्षीं त्यांना रोज ५०० रुपये देण्यांत यावयाचे आहेत. ह्या रकमेवर करहि घेण्यांत येणार नाहीं.

**झांशीच्या राणीचा राजवाडा**—झांशीच्या राणीचा लखनौ येथील राजवाडा राष्ट्रीय महत्त्वाचें स्मारक म्हणून भारतीय सरकारनें आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या वाड्यांत सध्यां उत्तर-प्रदेश सरकारची पोलिस कचेरी आहे. कचेरी दुसरीकडे हलविण्यांत आल्यावर राजवाड्याचा ताबा भारतीय सरकारला देण्यांत येणार आहे.

**बिर्लांची १४ लाखांची देणगी**—प. बंगालमध्यें एक शेतकी कॉलेज काढण्यासाठीं सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला ह्यांनीं १४ लाख रुपयांची देणगी देण्याची तयारी दाखविली आहे. राज्याचे मुख्य प्रधान डॉ. रॉय ह्यांनीं देणगी घेण्याचें मान्य केलें आहे. हारिंगहाता ह्या ठिकाणीं सध्यां प. बंगाल सरकार एक डेअरी आणि मोठी शेती चालवीत आहे. त्याच ठिकाणीं नवीन कॉलेज काढण्यांत येईल, अशी अपेक्षा आहे.

**कोळशाचें उत्पादन वाढलें**—भारतामधील कोळशाच्या खाणींतून १९५३ च्या डिसेंबर महिन्यांत ३१,६३,२३३ टन कोळसा काढण्यांत आला. नोव्हेंबर महिन्यांतील उत्पादनापेक्षा हें उत्पादन ५,२६,७३१ टनांनीं अधिक आहे. खाणींतून काम करणाऱ्या कामगारांची दैनिक सरासरी उपस्थिति मात्र ७,२६४ नीं कमी झाल्याचें आढळून आलें.

**प. बंगालचें विकास-कर्ज**—प. बंगाल सरकार पुढील फडणिशी वर्षांत ५ कोटी रुपयांचें कर्ज उभारणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग राज्यांतील विकास-योजना पूर्ण करण्यासाठीं आणि जमीनदारी रद्द केल्यानंतर द्यावयाच्या नुकसानभरपाईसाठीं करण्यांत यावयाचा आहे.

**शाळांतील विद्यार्थ्यांचा आहार**—उत्तर-प्रदेश राज्यांतील ६,००० शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहाराविषयीं राज्याच्या आरोग्यखात्यानें नुकतीच तपासणी केली. एकूण ६,३७१ विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करण्यांत आली असतांना ३,७८१ विद्यार्थ्यांना निकृष्ट आहारामुळें होणारे रोग जडले असल्याचें आढळून आलें.

**हातमाग-कापडावर विक्रीकर नाहीं!**—भारतीय सरकारनें राज्य सरकारांना अशी सूचना केली आहे कीं, हातमागाच्या कापडावर विक्रीकर घेण्याचें त्यांनीं रद्द करावें. हातमागाच्या कापडाच्या धंद्याला मदत म्हणून ५ रुपये अगर अधिक किंमतीचें कापड खरेदी केल्यास त्यावर ९ ते १८ पै पर्यंत सूट देण्याचें धोरण मध्यवर्ती सरकारनें स्वीकारलेलें आहे. अशाच प्रकारची सूट खादीच्या कापडाच्या विक्रीवर देण्यांत येत असते.

**राजधान्यांच्या दरम्यान विमानवहातूक**—भारतामधील निरनिराळ्या राज्यांच्या राजधान्या विमानमार्गानें जोडण्याच्या योजनेचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे असें समजतें. मात्र विमानतळ बांधण्यासाठीं योग्य अशी जागा जवळपास आहे कीं नाहीं आणि पुरेशी वहातूक मिळेल कीं नाहीं ह्या दोन बाबींचा आधीं विचार करण्यांत येणार आहे. २७ राज्यांपैकीं २० राज्यांच्या प्रमुख शहरांजवळ विमानतळ आहेत. आंध्र, आसाम, पंजाब, अजमीर, कूर्ग, हिमाचल प्रदेश व विंध्य प्रदेश ह्या राज्यांना मात्र असें विमानतळ उपलब्ध नाहींत.

**राणीसाठीं खास सुरक्षागृह**—राणी एलिझाबेथ आणि तिचा परिवार ह्यांच्यासाठीं एक खास सुरक्षागृह विंडसर कॅसल येथें बांधण्यांत येत आहे. इंग्लंडवर अणुबॉंबचा हल्ला झाला तर राजकुटुंब रहाण्याची जागा म्हणून ह्या गृहाचा उपयोग करील. सुरक्षागृहांत सर्व प्रकारच्या सोयी करण्यांत आल्या आहेत.

### सहकारी प्रयत्नांनीं वीजनिर्मिति

मुंबईचे मुख्य मंत्री श्री. मुरारजीभाई देसाई यांनीं दक्षिण सातारा जिल्ह्यांत तासगांव इलेक्ट्रिसिटी को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या नव्या इमारतीचें उद्घाटन केलें. तसेंच तासगांवच्या वीजपुरवठ्याचेंहि त्यांनीं उद्घाटन केलें. सहकारी प्रयत्नांनीं गांवास वीजपुरवठा केल्याबद्दल त्यांनीं सदरहू सोसायटीच्या संस्थापकांना धन्यवाद दिले आणि ही सहकाराची वृत्ति जीवनाच्या इतर सर्व क्षेत्रांत पसरली पाहिजे, असें ते म्हणाले.

सदरहू पॉवरहाऊस सहकारी प्रयत्नांनीं बांधण्यांत आलें असून त्यांत १०५ किलोवॅट वीजनिर्मिति करणारे दोन जनरेटर बसविण्यांत आले आहेत. या सोसायटीचे एकूण ३७२ सभासद असून तिचें खेळतें भांडवल दोन लाख रुपयांहून अधिक आहे. सहकारी तत्त्वावर क्वचितच वीजनिर्मिति केली जाते, त्या दृष्टीनें हा एक वैशिष्ट्यपूर्ण असा प्रयोग आहे, असें म्हणतां येईल.

### जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांना आर्थिक मदत

जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांना मजुरीच्या कामाचीं कंत्राटें घेतां यावीत म्हणून त्यांना ज्या योजनेअन्वयें जादा आर्थिक साहाय्य देण्यांत येतें, तिची मुदत मुंबई सरकारनें ३१ मार्च, १९५५ पर्यंत वाढविली आहे. सदरहू योजनेनुसार जॉइंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रिज हे अशा सहकारी संस्थेला खेळत्या भांडवलासाठीं ५,००० रुपयांपर्यंत कर्ज देतात. या कर्जाचा उपयोग कर्ज घेणाऱ्या संस्थेनें कूपांव्यतिरिक्त इतर मजुरीच्या कामासाठीं करावयाचा असतो. कर्जाची परतफेड नेहमीच्या अटींवर पांच वर्षांत करावयाची असते. मजुरी कंत्राट संस्था आणि जंगल कामगारांच्या सहकारी संस्था यांचें काम सामान्यतः निरनिराळ्या हंगामांत चालतें.

### सरकारतर्फे देण्यांत येणारी हमी

मुंबई सरकारचा हमी देण्याचा अधिकार ३० कोटी रुपयांपर्यंत मर्यादित करण्याचा विचार असून त्यासंबंधीचें बिल मुंबई सरकारच्या ता. १० फेब्रुवारीच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. भारताच्या घटनेंतील २९३ कलमाच्या पोटकलम ( १ ) अन्वयें राज्य सरकारांना कायदेमंडळ ठरवून देईल तेवढ्या मर्यादेपर्यंतच्या रकमेची हमी देण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. परंतु या तरतुदीप्रमाणें राज्य कायदेमंडळानें अजून अशा प्रकारची मर्यादा ठरवून दिलेली नाहीं. ठरवून दिलेल्या मर्यादेच्या आंतील रकमेची हमी पूर्ण करण्यासाठीं जो खर्च येईल तो राज्याच्या कन्सॉलिडेटेड फंडांतून करण्याची तरतूदहि सदरहू बिलांत करण्यांत आली असून राज्य कायदेमंडळापुढें हमीबाबतचें व त्याप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाचे आंकडे सादर करण्याची तरतूद बिलांत करण्यांत आली आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.



किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे





वसंत नं. ३ चरक

" शरद चरक "

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)



दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विकीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. म. बापट, उपाध्यक्ष

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. मो. धों. जोमळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# अर्थ

बुधवार, ता. २४ फेब्रुवारी, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारताच्या औद्योगीकरणांतील अडचणी

भारतावर ब्रिटिश राजवट असतांना मध्यवर्ती सरकारचे फडणीस म्हणून काम केलेले सर जेरेमी रैसमन हे नुकतेंच भारतांत येऊन गेले. त्यांनीं भारतांत एक महिनाभर दौरा काढून येथील औद्योगिक परिस्थितीचें निरीक्षण केलें. त्यानंतर ह्या विषयासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, कामगारांना न्याय्य रीतीनें वागविण्यांत आलें पाहिजे असेंच माझें मत आहे. पण ह्या बाबतींत एक धोका आहे. एखाद्या विशिष्ट वेळीं ज्या लोकांना उद्योगधंद्यांत रोजगार असतो ते एक प्रकारचे मिरासदार बनतात आणि मग बदलत्या परिस्थितीप्रमाणें बदलून अधिक रोजगार निर्माण करण्याकडे दुर्लक्ष होऊन, ह्या विशिष्ट वर्गाच्या हक्कांसाठी उद्योगधंद्यांना राबविण्याची प्रवृत्ति निर्माण होते. कामगारविषयक कायदे आणि निवाडे ह्यांच्यामुळें अर्थव्यवस्था लवचिक राहण्याऐवजीं साचेबंद होऊं लागते. त्यामुळें बेकारी कमी करण्याचे प्रयत्न अपेशीं होणार, हें ठरल्यासारखेंच होतें. बदलत्या परिस्थितीबरोबर बदलण्याचा लवचिकपणा जर उद्योगधंद्यांत नसेल, तर आहेत तेच कारखाने चालविणें अशक्य होऊं लागेल; मग नवीन कारखाने काढण्याची गोष्ट दूरच राहिली. सरकारला बेकारीला आळा घालावयाचा आहे, पण त्यासाठीं जे उपाय योजण्यांत येतात त्यांनीं ती कमी होण्याचा संभव मात्र दुरावत जातो. धंद्याचा विस्तार करण्याची संधि दिसल्याबरोबर तिचा फायदा घेण्याचें स्वातंत्र्य कारखानदाराला पाहिजे. त्यामुळेंच कामगारांनाहि अधिक संधि मिळेल. पण, एखाद्या कामगाराला कामावर घेणें म्हणजे कायमची आर्थिक जबाबदारी डोक्यावर घेणें असा जर अर्थ होत असेल तर कोठलाहि मालक धंद्याची वाढ करण्यापूर्वी हजारदां विचार केल्याशिवाय राहणार नाहीं.

उद्योगधंद्यांची पुनर्घटना करण्यासाठी कारखानदारांनीं ज्या रकमा राखून ठेवल्या आहेत त्यांचा उपयोग करण्याच्या बाबतींत भारत सरकारनें हस्तक्षेप करण्याचा विचार चालविला आहे. त्याबद्दल बोलतांना मि. रैसमन म्हणाले कीं, अमुक एका प्रकारानेंच पुनर्घटना करण्यांत यावी असा आग्रह सरकारनें धरला तर खाजगी उद्योगधंद्यांची गळचेपी होईल. कांहीं कारखानदार ह्या पैशाचा उपयोग धंद्याच्या विकासासाठीं योग्य मार्गानें करीत नसतीलहि. पण ह्या सबबीवर सरकारनें धंद्यांच्या कारभारांत अधिक खोल हात घातला तर खाजगी धंद्यांत पुढाकार घेण्याची प्रवृत्ति नाहींशी होईल. तें असो; पण एखाद्या कारखानदाराला आपला व्यवसाय नीट चालवितां येत नसेल तर सरकारी हस्तक्षेपामुळें काय अधिक चांगलें होईल तें मात्र मला समजत नाहीं, असें ते म्हणाले.

पंचवार्षिक योजनेप्रमाणें व्हावयाच्या खर्चात ८० कोटी ते १०० कोटी रुपयांची जी घट झाली आहे त्यासंबंधीं त्यांनीं असें मत व्यक्त केलें कीं ह्या घटनेंत घाबरण्यासारखें कांहीं नाहीं. पंचवार्षिक योजनेच्या प्रगतींत जरी थोडी थंडाई आलेली असली तरी त्याप्रमाणांत चलनवृद्धि करून पैशाची गुंतवणूक केल्यामुळें जो धोका निर्माण होतो तो कांहीं प्रमाणांत कमी होईल, हें लक्षांत घेतलें पाहिजे. योजनेमधील उत्पादक भागाची आगेकूच चालू रहावी ही खरी महत्त्वाची बाब आहे. सर जेरेमी ह्यांच्या मताप्रमाणें भारतापुढें एकच प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे; आणि तो म्हणजे पंचवार्षिक आर्थिक योजनेची प्रगति आणि त्यासाठीं करावी लागणारी चलनवृद्धि. ते पुढें म्हणाले कीं, पूर्वी माझें असें मत होतें कीं मंदीच्या काळांत चलनवृद्धि करून पैसा उभा करणें अहितकारक नाहीं. पण अलीकडे मला असें वाटूं लागलें आहे कीं इंटर–नॅशनल मॉनेटरी फंडाच्या कार्यकर्त्यांनीं जें मत व्यक्त केलें आहे तेंच बरोबर आहे. त्यांनीं असें म्हटलें आहे कीं भारतासारख्या देशांत चलनवृद्धि करून पैसा उभा करणें ही गोष्ट फार गंभीर स्वरूपाची आहे. ह्या पद्धतीनें पैसा उभारण्याच्या कामीं फार अन्याय होतो आणि बचत करण्याची वृत्ति आणि काटकसरीपणा ह्यांच्यावर फार अनिष्ट परिणाम होतो. युद्धाच्या काळांत चलनवृद्धि करणें अपरिहार्य ठरूं शकेल. कारण, अशावेळीं आपणांस साधनसामुग्रीचा उपयोग इतका जलद करावयाचा असतो कीं, समाजांतील सर्व थरांवर योग्य बोजा टाकण्यासाठीं जरूर ती यंत्रणा उभी करण्यास सवडच मिळत नाहीं. पण शांततेच्या काळांत आपण आपले आर्थिक व्यवहार संथपणानें नियोजित करीत असतां आपण आपली मदार चलनवृद्धीवर टाकतां उपयोगी नाहीं. भारतासारख्या राहणीचें मान कमी असलेल्या देशांत असें करतां उपयोगी नाहींच नाहीं.

"बँकांवरील सध्यांचीं बंधनें ढिलीं करून उद्योगधंद्यांना लागणारा पैसा उभा करण्यास माझा विरोध आहे. एकाद्या दुकटच्या बँकेनें तर असें करूच नये. भारतांत बँकांनीं केलेला अशा प्रकारचा धाडसीपणा मागें अंगावर आलेला आहे. भारतांत अजून बँकांच्या व्यवहाराच्या निरोगी परंपरा निर्माण व्हावयाच्या आहेत. उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यासाठीं कांहीं विशेष प्रकारच्या संस्था काढणेंच योग्य होईल. उद्योगधंद्यांना लागणारें दीर्घ मुदतीचें भांडवल पुरविण्यासाठीं ब्रिटनमध्यें अशा संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. बँका ह्या संस्थांमार्फत भांडवल पुरविण्याच्या कामीं हातभार लावतात. तथापि हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं नुसत्या भांडवलाच्या पुरवठ्यामुळें विकास साधेल असें नाहीं."

---

**नेपा गिरणींतील कागद**—मध्य प्रदेशांत काढण्यांत येत असलेल्या नेपा गिरणींत कागदाच्या उत्पादनास चालू वर्षअखेर प्रारंभ होईल, असें समजतें. कागदाच्या उत्पादनास लागणारा कच्चा माल गिरणीस २५ वर्षे तरी सतत मिळेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**हातमागाच्या धंद्याला मदत**—हातमागाच्या धंद्याला मदत आणि कर्जे देण्यासाठी भारतीय सरकारनें १,९५,००० रुपयांची रकम मंजूर केली आहे. ह्या रकमेंतून प. बंगाल, ओरिसा, उत्तर प्रदेश, सौराष्ट्र, अजमीर आणि मध्यभारत ह्या राज्यांतील हातमागाच्या व्यवसायाला आर्थिक मदत करण्यांत यावयाची आहे.

## बँकांच्या जाहिराती "रामबाण" कशा होतील

केव्हांतरी एक मोठी जाहिरात देण्यापेक्षा वरचेवर लहान जाहिरात चालू ठेवणें बँकांच्या दृष्टीनें फायद्याचें ठरतें, असा अनुभव आहे. बँकांच्या जाहिरातींबाबत अमेरिकेंत केल्या गेलेल्या संशोधनाचा निष्कर्ष असाच आहे. मोठ्या जाहिरातींना खर्च ज्यास्त येत असल्याकारणानें त्या वारंवार देणें परवडत नाहीं. त्यापेक्षा लहान जाहिराती मधून मधून देत रहाणें बँकांना परवडतेंहि व तें उपयुक्तहि होतें. जनतेच्या समोर बँकेचें नांव सतत रहाण्यास त्याचा उपयोग होतो. अशा जाहिराती कशा तयार कराव्या, ह्याबद्दल कांहीं सूचना "बँकर्स मंथली"नें केल्या आहेत, त्या मार्गदर्शक ठरतील.

(१) लहान जाहिरातीच्या जागेंत बँकेच्या विविध कार्याचा उल्लेख करणें अशक्य असतें. विशिष्ट बँकेशींच व्यवहार का करावा, हें थोडक्या जागेंत पटवून देणें शक्य होत नाहीं. रायफल आणि शॉटगन ह्यांच्या नेमांतील फरक, तोच लहान जाहिरात व मोठी जाहिरात ह्यांच्या नेमांतील फरक. रायफलच्या नेमांत फार मोठें क्षेत्र येत नाहीं,पण त्याचा नेम खरोखरच "रामबाण" असतो.

(२) जाहिरातांच्या शीर्षकांत परिणामकारकपणा असू द्या. लहान जाहिरातीच्या उपयुक्ततेंतील ४० ते ६०% वाटा तिच्या शीर्षकाचा असतो. ज्या वाचकांच्या हातीं जाहिरात पडेल, त्यांना अनुलक्षून शीर्षक योजावें. बँकेच्या वैशिष्ट्यांपैकीं एकादेंच वैशिष्ट्य (सोईस्कर ठिकाणीं शाखा, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, इ.) शीर्षकांत सांगावें. लहान जाहिरातीच्या शीर्षकांत तीनपेक्षां ज्यास्त शब्द सहसा नसावेत. त्यामुळें, त्याकडे लक्ष वेधलें जातें. शीर्षकासाठीं ठळक टाईप वापरावा. शीर्षकांत ज्यास्त शब्द असले, तर त्यापैकीं फक्त महत्त्वाचे शब्द अधिक ठळक शब्दांत यावेत.

(३) पाल्हाळ टाळावा. पहिल्या शब्दापासूनच जें म्हणावयाचें, तें सांगण्यास प्रारंभ करावा. एक शब्द पुरत असला, तर दोन शब्द वापरूं नका. कमी अक्षरांचे शब्द निवडले, म्हणजे मजकूर वाचण्यास सोपें जातें. अगदीं बारीक टाईप टाळावा.

(४) बँकेचें नांव प्रामुख्यानें छापावें. बँकेच्या लौकिकास धरून पण लक्ष वेधण्यास जरूर तेवढा मोठा टाईप असावा. पृष्ठ पाहणाऱ्यालाहि बँकेचें नांव सहज वाचतां यावें, म्हणजे आज त्याला बँकेची गरज नसली तरी योग्य वेळीं त्याला त्या बँकेची आठवण होईल.

(५) जाहिरातीला बॉर्डर असावी. म्हणजे, शेजारच्या जाहिरातीच्या मजकुरांतून ती वेगळी उठून दिसेल. निदान वर आणि खालीं तरी बॉर्डर टाकावी.

(६) वृत्तपत्रांतील विशेष महत्त्वाची जागा शक्यतों मिळवा. वृत्तपत्रेंहि बँकांना मोक्याची जागा देण्यास तयार असतात; कारण त्यामुळें वृत्तपत्राचीहि प्रतिष्ठा वाढते.

(७) जाहिरातीची लांबी-रुंदी किती असावी, हें बँक, वृत्तपत्र आणि वाचकवर्ग ह्यावर अवलंबून राहील.

### रेल्वेजचें अंदाजपत्रक
(आकडे कोटी रुपयांचे)

| | १९५२-५३ प्रत्यक्ष | १९५३-५४ अंदाज | १९५३-५४ दुरुस्त अंदाज | १९५४-५५ अंदाज |
|---|---|---|---|---|
| वहातुकीचें उत्पन्न | २७०·५६ | २७२·२८ | २७२·०० | २७३·२५ |
| खर्च | १८८·१७ | १९१·२० | १९७·८७ | १९४·५३ |
| निव्वळ उत्पन्न | ४७·१८ | ४४·०८ | ३७·६४ | ४०·६४ |
| मध्यवर्ती सरकारला | ३३·९९ | ३४·७७ | ३४·४६ | ३५·५० |
| निव्वळ वाढावा | १३·१९ | ९·३१ | ३·१८ | ५·१४ |

### रशिआचें सोन्याचें उत्पादन

अमेरिकेच्या ब्यूरो ऑफ माइन्स ह्या संस्थेनें रशिआंतील सोन्याच्या उत्पादनाचा अंदाज प्रसिद्ध केला आहे. गेल्या कांहीं दिवसांत रशिआचें सोनें आंतरराष्ट्रीय बाजारांत आल्यामुळें त्या देशांतील सोन्याच्या उत्पादनाविषयीं बरेंच औत्सुक्य उत्पन्न झालें होतें. रशिआंतील कोणत्याहि प्रकारच्या उत्पादनाचे आंकडे टक्केवारींत प्रसिद्ध करण्यांत येत असतात. त्यांतहि गेल्या महायुद्धानंतर हे टक्केवारीचे सोन्यासंबंधी आंकडेसुद्धा प्रसिद्ध करण्यांत आलेले नाहींत. बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट्सनें आपल्या १९४९-५० च्या अहवालांत जगांतील सुवर्णोत्पादनासंबंधीं अंदाज व्यक्त केला होता. अहवालांत रशिआंतील उत्पादन ४ कोटी औंस धरण्यांत आलें होतें. पण बँकेच्या त्यानंतरच्या अहवालांत रशिआच्या उत्पादनाविषयीं कांहीं माहिती सांपडत नाहीं. ब्यूरो ऑफ माइन्सनें केलेल्या अंदाजाप्रमाणें रशिआचें सुवर्णाचें उत्पादन १९४८-४९ सालीं प्रत्येकीं ७० लाख औंस असावें. १९५० सालीं ते ८० लाख औंस असावें आणि १९५१ व ५२ सालीं ९५ लाख औंस असावें. आतांपर्यंत रशिआच्या सुवर्णाच्या उत्पादनाचे जे अंदाज करण्यांत आले होते, त्यापेक्षा हे अंदाज बरेच जास्त आहेत. रशिआ सोडून इतर जगांत १९४८ ते ५२ पर्यंतच्या काळांत २·३ ते २·५ कोटी औंस सुवर्णाचें उत्पादन झालें. द. आफ्रिकेंत दरवर्षी १·१ कोटी औंस सोनें उत्पादन केलें जातें. रशिआच्या सुवर्णाच्या उत्पादनाचे वर दिलेले आंकडे बहुधा बरोबर असले तरी दरवर्षी ८० ते ९० लाख औंस सोनें ह्यापुढें रशिआंत निर्माण होऊं शकणार नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. रशिअन सरकार स्वतः सोन्याच्या कांहीं नव्या खाणी शोधतें आणि बाकीच्या उत्पादनासाठी खाजगी व्यक्तींच्या परिश्रमावर अवलंबून असतें. ह्या व्यक्ती ज्या ठिकाणीं संशोधन करतात तेथील सोनें फार दिवस सांपडण्यासारखें नसतें.

### कोल्हापूर बँकनोकरांचा क्रिकेट सामना

रविवार ता. १४।२।५४ रोजीं कोल्हापूर होमगार्डस् विरुद्ध बँक-नोकर संघ यांमध्यें मित्रत्वाचा सामना कोल्हापूर येथें झाला. त्यांत होमगार्डसचा विजय झाला.

बँकनोकरवर्ग संघ १ ला डाव ७४<br>
२ रा डाव ८० (कुलकर्णी व्ही. एम्. ५६)

कोल्हापूर होमगार्डस संघ १ ला डाव ८९ (दिवटे २२)<br>
२ रा डाव ९४ (सरनोबत ५७)

कोल्हापूर होमगार्डसकडून श्री. सरनोबत (५७) व दिवटे (२२) यांचा खेळ चांगला झाला व श्री. रुपे व कमलाकर बोढके यांची गोलंदाजी परिणामकारक झाली. बँकनोकरवर्ग संघाकडून कुलकर्णी व्ही.एम्. (युनियन बँक ५६ धांवा) व जोशी एच. डी. (युनायटेड कं. बँक) यांची फलंदाजी चांगली झाली व जाधव जी. एल. (युनियन बँक) व कुलकर्णी व्ही. एन. यांची गोलंदाजी परिणामकारक झाली.

### संग्रहालयीन वार्ता

ऑगस्ट रेनॉयर या सुप्रसिद्ध चित्रकारानें काढलेलें कुरटाल्ड विश्वस्त निधीच्या देणगींतून खरेदी केलेलें एका युवतीचें एक तैलचित्र टेट गॅलरी या संस्थेनें सुमारें एक लक्ष रुपयांस विकलें व तें एका खाजगी व्यक्तीच्या संग्रहांत गेलें आहे.

## अंदाजपत्रकांबद्दल अपेक्षा

( लेखकः—भा. म. काळे )

फेब्रुवारीअखेर हिंद सरकारचें, रेल्वेचें व सर्व प्रांतिक सरकारांचीं अंदाजपत्रकें कायदेमंडळांना सादर केलीं जातील, व अंदाजपत्रकांत सुमारें रु. ९०० कोटी करांचें उत्पन्न समाविष्ट केलें जात असल्यामुळें, व ही रक्कम हिंदच्या वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारें १० टक्के असल्यामुळें अंदाजपत्रकांतील करविषयक योजनांचा जनतेच्या जीवनाशीं निकटचा संबंध येतो. गेलें एक–दीड वर्ष कारखानदार व व्यापारी, करांचें दडपण डोईजड झालें आहे व करांच्या बाबतींत कांहीं सवलती दिल्याशिवाय भांडवल–संचय व भांडवल–गुंतवणूक या बाबतींत परिस्थिति सुधारणार नाहीं असें अगदीं त्रागा करून सांगत आहेत. प्रांतांमधला विक्री–कर सामान्य लोकांना डोईजड वाटत आहे. तंबाखु, सुपारी व चहा यांवरील करहि सामान्य जनतेला डोईजड वाटत आहे. गेल्या दीड वर्षांत जनतेची क्रयशक्ति घटत चालली आहे हें अनेक ठिकाणीं अनुभवास येत आहे. सर्व प्रकारच्या मोटारींवरील करांचें दडपण असह्य झालें आहे अशी मोटार धंद्यांतील लोकांची व रोड ट्रॅन्स्पोर्ट असोसिएशनची तक्रार आहे. जनता करविषयक सवलतींची उत्सुकतेनें अपेक्षा करीत आहे.

परंतु, त्याचबरोबर, सरकारलाहि खर्च तितक्याच निश्चितपणें करणें अपरिहार्य झालें आहे. कारण, पुढील दोन वर्षांचा काळ, म्हणजे १९५४ ते ५६ हा काळ आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांचा काळ आहे, व या दोन वर्षांत मिळून सुमारें १२०० कोटी रु. खर्च केला जाणार आहे. मुलकी व लष्करी खर्चांत म्हणण्यासारखी काटकसर केली जाण्याची शक्यता कांहींच दिसत नाहीं.

हिंद सरकारचीं जमेचीं तीन प्रमुख साधनें आहेत. कस्टमच्या आयात व निर्यात जकाती, प्राप्तीवरील कर, व उत्पादनावरील कर या तिहींपासूनच सरकारला मोठें उत्पन्न मिळतें. चालू वर्षी या तीनहि करांच्या उत्पन्नाचा अंदाज रु. ४२१ कोटी करण्यांत आला होता, परंतु चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत या करांचें उत्पन्न रु. २७७ कोटी आलें आहे, म्हणजे बाकीचें रु. १४४ कोटी उत्पन्न शेवटच्या तिमाहींत हातीं आलें पाहिजे. व्यापाराची परिस्थिति समाधानकारक नसल्यामुळें व ताग, कापड इ. बाबतींत निर्गतीवरील जकाती कमी कराव्या लागल्यामुळें कस्टमच्या जकातींपासून उत्पन्न विशेष प्रकारें घटणार आहे. प्राप्तीकराचेंहि उत्पन्न किंचित् कमी येईल. फक्त उत्पादनावरील जकातींचें उत्पन्न अपेक्षेइतकें येईल. वरील तीन करांच्या उत्पन्नांत निदान रु. २० ते ३० कोटी तूट येईल असा अंदाज आहे. अर्थात या तुटीचा परिणाम पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकावर होईल. रेल्वेचें उतारूंच्या वाहतुकीपासूनचें उत्पन्न चालू वर्षी सुमारें रु. १० कोटी कमी येईल. प्रांतिक सरकारांची उत्पन्नाची परिस्थिति समाधानकारक नसावी; कारण नुकतीच मध्यवर्ती सरकारनें प्रांतांनीं पंचवार्षिक योजनेच्या खर्चासाठी त्यांच्यावर लादलेल्या खर्चापैकीं फक्त ५० टक्केच खर्चाची तरतूद केली आहे, या गोष्टीची प्रांतांना जाणीव करून दिली आहे व योजनेसाठी पैसा मिळविण्याचे नेटानें प्रयत्न करण्याविषयीं सुचविलें आहे.

करविषयक चौकशी कमिशनचें काम डॉ. जॉन मथाई यांच्या अध्यक्षतेखालीं चालूं असून, कमिशनचा अहवाल वर्षअखेर प्रसिद्ध होणार असल्यामुळें करांच्या बाबतींत यंदा कांहींच फेरबदल केले जाणार नाहींत, हें बरेच दिवसांपूर्वी हिंद सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं सांगितलेंच आहे. तेव्हां नवीन अंदाजपत्रकांत कोणतेहि कर कमी केले जाण्याची कांहींच शक्यता दिसत नाहीं. चालू वर्षी रु. ४० कोटी खर्च सरकारनें बिन–तारणाच्या नोटा छापून केला हेंहि जानेवारी महिन्यांत अर्थमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. पुढील वर्षी परदेशांकडून चालू वर्षाइतकीच मदत मिळूं शकेल अशी बातमी फेब्रुवारीच्या सुरवातीला आली आहे. तरीहि एकंदर संभाव्य उत्पन्न व सर्व प्रकारचा आवश्यक खर्च यांची परिस्थिति विचारांत घेतली असतां सरकार निदान रु. ३०० कोटी खर्च १९५४–५५ मध्यें नोटा छापून भागवील असें दिसत आहे. अशाप्रकारें १९५५–५६ मध्येंहि बिनतारणाच्या नोटा छापून खर्च करावा लागेल.

नोटा छापून खर्च करणें ही गोष्ट अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. परंतु, दुसरा कोणताच मार्ग उपलब्ध नसल्यामुळें बिनतारणाच्या नोटा छापून खर्च केल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी सरकारची विचारसरणी आहे. ३८६ पर्यंत उतरलेला सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतीचा निर्देशांक डिसेंबरपासून पुन्हां हळू हळू चढत जाऊन तो ३० जानेवारी, १९५४ ला पूर्ण झालेल्या आठवड्यांत ३९९.६ पर्यंत चढला आहे. शेती माल व औद्योगिक माल यांचें उत्पादन वाढलें असतांहि वस्तूंच्या किंमतींच्या निर्देशांकांत झालेल्या वाढीशीं, रु. ४० कोटी खर्च नोटा छापून करण्यांत आला याचा कांहीं संबंध आहे किंवा काय याचा विचार केला पाहिजे.

सारांश, १९५४–५५ च्या अंदाजपत्रकांच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारें उत्साहजनक परिस्थिति आढळण्याचा संभव नाहीं. करांचें दडपण आहे तसेंच चालूं राहाणार व बराचसा खर्च बिनतारणाच्या नोटा छापून भागविला जाईल असें दिसत आहे. पावसाची परिस्थिति समाधानकारक राहिल्यास शेतीचें उत्पन्न थोडेंसें वाढेल व उद्योगधंद्यांचेंहि उत्पन्न कांहींसें वाढेल एवढीच एक आशेची बाजू दिसत आहे. परंतु, वाढत्या खर्चाच्या परिस्थितीला आपल्या अर्थव्यवस्थेला तोंड द्यावें लागणार हें निश्चित.

---

## कण आणि क्षण

( लेखसंग्रह, लेखक–श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ', दुर्गाधिवास, पुणें ४. लेखसंख्या ३०, पृ. संख्या १६८, किंमत २॥ रुपये. )

कणशः धन आणि क्षणशः विद्या मिळविण्याच्या व्यवहार्य तत्त्वाप्रमाणें जीवनांतील निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत आपण थोडें जपून चाललों व तपशीलाची दखल घेतली तर आपलें आयुष्य आपण कसें सुखी करूं शकूं ह्याबद्दलच्या उपयुक्त सूचनांनीं हें पुस्तक खचून भरलें आहे. सूक्ष्म निरीक्षण, प्रपंचांतील घडामोडींचें दाखले, जीवन सुखी करण्याची कसोशी आणि कसलेली लेखनशैली ह्या गुणसमुच्चयामुळें हे लेख पटकन गळीं उतरतात. उपदेश असूनहि उपदेशसाहस्रीसारखा ह्यांत कंटाळवाणेपणा नाहीं. ह्या सर्वच लिखाणावर लघुनिबंधाची झांक आहे आणि आधुनिक स्त्रीपुरुषांविषयीं लेखकाला सहृदयता वाटत असल्यामुळें हे लेख म्हणजे आपल्या मित्राचेंच जिव्हाळ्याचें हितगुज वाटतें. चालू पिढीचा संसार सुखाचा व्हावा ही तळमळ, विशेषतः स्त्रीजीवनाविषयींचा अद्यावत दृष्टिकोन ही ह्या पुस्तकाची विशेषता आहे. प्रसिद्ध मासिकांतून हे लेख पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत, त्यांचा संग्रहहि संग्रहणीय वाटतो.

—महाराष्ट्र विस्तार, डिसेंबर, १९५३

## आपली १० रुपयांची नोट

### (२)

१९५२–५३ च्या असेरचे आकडे घेऊन, आपण आपल्या नोटेच्या आधाराची छाननी करूं या. मार्च १९५३ असेर रिझर्व्ह बँकेनें १११६ कोटी रुपये किंमतीच्या चलनी नोटा काढलेल्या होत्या. त्यास तारण खालीलप्रमाणें होतें—४०·०२ कोटी रु. सोनें; ५५८ कोटी रु. चे विदेशांचे रोखे, ९६·४७ कोटी रुपये (त्यांत रुपयाच्या नोटाहि येतात.) आणि ४२१·१२ कोटी रुपयांचे भारतीय रोखे.

वरील १११६·०५ कोटी रुपयांच्या चलनी नोटांत जनतेजवळ असलेल्या व बँकांजवळ असलेल्या चलनी नोटांचा समावेश होतो; एक रुपयाच्या नोटांना रुपये कल्पिलेले असल्यानें त्यांचा समावेश ह्यांत होत नाहीं.

रिझर्व्ह बँकेचें इश्यू खातें हें चलनी नोटांशीं संबंधित खातें आहे. हें खातें बँकिंग खात्यापासून अगदीं वेगळें ठेवण्यांत आलेलें आहे आणि इश्यू खात्याची जी जिंदगी असते, ती चलनी नोटांस्हा तारण म्हणून राखून ठेवलेली असते. ह्या जिंदगीत सोनें, परदेशी रोखे, रुपये, भारतीय रोखे, ह्यांचा समावेश होतो आणि ह्या सर्वांच्या बेरजेची रक्कम इश्यू खात्याच्या देण्यापेक्षा म्हणजे तिच्या चलनी नोटांपेक्षा जास्त भरता कामा नये. ह्या जिंदगीपैकी दोन पंचमांश जिंदगी सोनें व विदेशी रोखे ह्यांचे स्वरूपांत असली पाहिजे व त्यांपैकी सोन्याची किंमत ४० कोटी रुपयांपेक्षा कमी असतां कामा नये.

नोटांसाठी जें एकूण तारण ठेवावयाचें, त्यांत किमान ४० कोटी रुपयांचें तरी सोनें असलें पाहिजे, असें रिझर्व्ह बँकेचा कायदा सांगतो. ८·४७५१२ ग्रेम्स सोनें = १ रु. अथवा १ तोळा = २३ रु. ३ आ. १० पै ह्या दरानें हिशेब करून, रिझर्व्ह बँकेनें ४०·०२ कोटी रुपयांचें सोनें बाळगलेलें आहे. चालू दरानें ह्यापेक्षा कितीतरी कमी सोनें बँकेजवळ असलें तरी चालेल.

रिझर्व्ह बँकेनें जेवढ्या रकमेच्या नोटा काढल्या असतील, तिच्या किमान ४०% रकमेइतकें तारण "परदेशी रोखे+सोनें" ह्यांचें असावें लागतें. १११६ कोटी रुपयांचे ४०% म्हणजे ४४६ कोटी रुपये होतात. ह्याचा अर्थ "परदेशी रोखे + सोनें" ह्यांची किंमत ४४६ कोटी भरली पाहिजे. ह्या बाबीच्या तारणाची फोड ४०·०२ कोटी रु चें सोनें व ५५८ कोटी रु. चे परदेशी रोखे, अशी आहे. म्हणजे, कायद्यानें सांगितलेल्या किमान ४०% पेक्षा प्रत्यक्ष गुंतवण बरीच जास्त (५४%) आहे, हें दिसून येईल. इंटरनॅशनल मोनेटरी फंडाचे सभासद असलेल्या राष्ट्रांपैकीं कोणत्याही राष्ट्राच्या चलनांत ज्या रोख्यांची परतफेड व्हावयाची आहे, त्यांस विदेशी रोखे अशी संज्ञा आहे. (अ) कोणत्याहि अशा देशांतील मध्यवर्ती बँकेंत किंवा तिच्या अभावीं इतर बँकेंत शिल्लक असलेला रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याची रक्कम, (ब) ९० दिवसांखालील मुदतीच्या, दोन किंवा अधिक चांगल्या सह्या असलेल्या व त्यांची विदेशांत रक्कम मिळवून देणाऱ्या हुंड्या आणि (२) पांच वर्षांचें आंत परतफेड होणारे त्या देशांच्या सरकारांचे रोखे, ह्यांची विदेशी रोख्यांत गणना होते.

चलनास तारण म्हणून कांहीं अंशीं रिझर्व्ह बँक रुपयेहि जवळ बाळगते (ह्या रुपयांत रुपयाच्या नोटाहि येतात.) अशा रुपयांची संख्या ५० कोटी रु असावी, किंवा ती रक्कम एकूण जिंदगीच्या ½ असावी (दोहोंपैकीं ज्यास्त भरेल, ती) असा संकेत आहे.


# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ असेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९१५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६३,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

लोकांनीं चलनी नोटा आणून दिल्या तर त्याचे रुपये त्यांना तातडीनें देतां यावे, ह्यासाठीं ही व्यवस्था आहे. वर सांगितल्यापेक्षा रिझर्व्ह बँकेजवळ अधिक किंवा कमी रुपये राहिले, तर मध्यवर्ती सरकारला रुपये दिले जातात किंवा त्याचेकडून ते घेतले जातात. चलनी नोटा ( १० रु. किंवा १०० रु. च्या ) सोनें किंवा रोखे ह्यांच्या बदलीनें हा व्यवहार केला जातो.

भारतीय रोख्यांत ट्रेझरी बिलें व भारत सरकारच्या सार्वजनिक कर्जासाठीं त्यानें दिलेले रोखे, ह्यांचा समावेश होतो.

व्यवहारांत खेळत असलेल्या एकूण चलनी नोटांपैकीं ४२·८% म्हणजे ४८७ कोटी रुपयांच्या नोटा १०० रुपयेवाल्या होत्या, ४१·४% म्हणजे ४६१ कोटी रुपयांच्या नोटा १० रुपयेवाल्या होत्या. ५ रुपयेवाल्या नोटांचें प्रमाण १२·७% व किंमत १४१ कोटी रुपये होती, आणि २ रु. वाल्या नोटा २·१% म्हणजे २३ कोटी रुपयांच्या होत्या. खेळत्या नोटांत १०० व १० रुपयेवाल्या नोटांचें प्रमाण सालोसाल वाढत आहे.

| २ रु. | % | ५ रु. | % | १० रु | % | १०० रु | % | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३,४३ | २·१ | १४१,२० | १२·७ | ४६१.६४ | ४१·४ | ४८७·४९ | ४३·८ | १११३,७६ |

भारताच्या पंचवार्षिक योजनेसाठीं एकूण २०६९ कोटी रुपये लागणार आहेत. एवढा पैसा म्हणजे आजच्या आपल्या राष्ट्रीय उत्पान्नाच्या २३ टक्के होतो. भारत सरकारच्या १९५३–५४ च्या अंदाजपत्रकांत ४३८·८१ कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद आहे. त्या तरतुदीच्या पावणेपांच पट पंचवार्षिक योजनेचा हा नवीन खर्च आहे. ह्या खर्चाची तरतूद खालीलप्रमाणें करण्याचें योजिलेलें आहे. सरकारचा नेहमींचा खर्च चालू राहून आणखी जादा खर्चाची ही तरतूद व्हावयाची आहे.

| | | कोटी रु. |
|---|---|---|
| हिंद सरकारच्या चालू करांतून | शिल्लक | १६० |
| रेल्वेपासून | शिल्लक | १७० |
| राज्यसरकारांच्या चालू करांतून | शिल्लक | ४०८ |
| खुल्या बाजारांतील कर्जें | | ११५ |
| निरनिराळ्या बचत-योजनांमुळें | | २७० |
| ठेवी, प्रॉव्हिडंट फंड इ. | | १३५ |
| तुटीचीं अंदाजपत्रकें ( नोटा छापून ) | | २९० |
| आतांपर्यंत मिळालेली परकी मदत | | १५६ |
| आणखी अपेक्षित परकी मदत | | ३६५ |
| | एकूण | २०६९ |

ह्याचा अर्थ, चालू करांतून व रेल्वेकडून मिळणाऱ्या जादा शिल्लकींतून रु. ७३८ कोटी उभारले जातील. कर्जें व बचत योजना यांवर रु. ५२० कोटींसाठीं अवलंबून राहावें लागेल. परकीय मदतीच्या रूपानें रु. ५२१ कोटी मिळाले पाहिजेत, व एवढे पैसे मिळाले तरीहि रु. २९० कोटींची नोटा तूट भासणार आहे व ती नोटा छापून भागविली जाईल.

जादा नोटा छापून खर्च भागविला जाईल, ह्याचा अर्थ समजून घेण्यासाठीं इश्यू खात्याच्या तक्त्यांतील आंकड्यांची छाननी करणें इष्ट होईल त्यांतील जिंदगीच्या बाजूस दाखविलेलें सोनें व विदेशी रोखे ह्यांत वाढ होण्याची शक्यता नाहीं; कारण परराष्ट्रीय व्यापारांतील तुटीमुळें म्हणजे निर्गतीपेक्षा आयात ज्यास्त होणार असल्यामुळें, विदेशी रोखे झाले तर कमीच होतील; आयात मालाच्या किंमतीचे पोटीं त्या रोख्यांचा विनियोग करावा लागेल. भारत सरकारचे रोखे ह्या सदराखालीं मात्र जिंदगी कृत्रिम रीतीनें वाढविण्यास जागा आहे. सरकारनें रिझर्व्ह बँकेला रोखा लिहून द्यावा आणि त्या रोख्याचे तारणावर रिझर्व्ह बँकेनें सरकारला नोटा पुरवाव्या, अशा पद्धतीनें सरकारच्या खर्चाला चलन उपलब्ध होईल. 'अ' + 'ब' ची बेरीज एकूण नोटांच्या ४०% पेक्षा कमी होत नाहीं, तोंपर्यंत अशा नोटा काढत जातां येतील. सोन्याची किंमतहि बाजारभावाशीं मिळती करून घेऊन तारणाचा आधार वाढवितां येईल व आणखी नोटा काढण्याचा मार्ग उपलब्ध होईल. ह्याहिपेक्षा कठीण प्रसंग आला, तर नोटा काढण्याबाबतचा कायदा अधिक ढिला करून परिस्थितीला तोंड देतां येईल. युद्धकाळांत ग्रेट ब्रिटननें ह्याच पद्धतीनें चलनी नोटांची संख्या कितीतरी पट वाढविली. सरकारची पत किती आहे, सरकारवर लोकांचा विश्वास किती आहे, लोकांचा त्यांच्या व देशाच्या भवितव्यावर विश्वास किती आहे, ह्यावर सर्व कांहीं अवलंबून असतें. नोटांचा पुरवठा वाढवून त्याचा विनियोग आपत्ति दूर करण्यासाठीं किंवा उत्पादनशक्ति वाढविण्यासाठीं केला, तर नोटा छापीत जाणें समर्थनीय ठरेल; परंतु लोकांची दुर्दशा वाढून कालांतरानेंहि परिस्थिति सुधारणार नसेल, तर अशा चलनविस्तारास लोकांचा पाठिंबा मिळणार नाहीं. वाढविलेल्या चलनाचा कार्यक्षम रीतीनें व काटकसरीनें उपयोग झाला पाहिजे व अखेर उत्पादन वाढून दुर्दशा टळली पाहिजे. ( समाप्त )

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें इश्यू खातें

( २५ सप्टेंबर, १९५३ )

| देणें | रु. | रु. | जिंदगी | रु. | रु. |
|---|---|---|---|---|---|
| | | | ( अ ) | | |
| बँकिंग खात्यांत | | | सोनें | ४०,०१,७१,००० | |
| ठेवलेल्या नोटा | ४४,५७,२३,००० | | विदेशी रोखे | ५५८,१५,११,००० | |
| व्यवहारांत खेळत्या | | | ( ब ) | | ५९८,१६,८२,००० |
| नोटा | १०७१,४८,४२,००० | | सोनें+विदेशी रोखे | | ९६,४६,७५,००० |
| एकूण काढलेल्या | | | रुपयांचीं नाणीं | | ४२१,४२,०८,००० |
| नोटा | | १११६,०५,६५,००० | भारत सरकारचे रोखे | | |
| | | | बिल्स ऑफ | | |
| | | | एक्सचेंज इ. | | ... |
| एकूण देणें | | १११६,०५,६५,००० | एकूण जिंदगी | | १११६,०५,६५,००० |

एकूण जिंदगीशीं 'अ' चें प्रमाण ५३·५९७ %

## इन्कमटॅक्सबाबत महत्त्वाचा निवाडा

असेसी ही एक नोंदलेली संस्था असून ती गोदरेज सोप्स लिमिटेड या संस्थेच्या मॅनेजिंग एजंटसचा धंदा करीत असे. मॅनेजिंग एजन्सीच्या करारपत्रानुसार असेसी यांनीं ३० वर्षेपर्यंत मॅनेजिंग एजंटस म्हणून काम करावें असें ठरविण्यांत आलें होतें. या कामगिरीबद्दल असेसी यांना वार्षिक निव्वळ नफ्यापैकीं २० टक्के नफ्याची रकम द्यावी असें ठरलें होतें. तसेंच फायदा जास्तच झाल्यास कांहीं विवक्षित कमिशन असेसी यांना देण्यांत यावें असेंहि ठरलें होतें. तदनंतर कंपनी आणि मॅनेजिंग एजंटस यांच्यामध्यें आपसांत एक करार तयार करण्यांत आला व त्यानुसार असेसी यांनीं एकूण ७,५०,००० रु. उक्ते घेण्याचें ठरवून वार्षिक नफ्यापैकीं शेंकडा १० च नफा घेण्याचें ठरविलें. म्हणजे, कंपनीनें मॅनेजिंग एजंटस यांना ७,५०,०००रु. ची रक्कम दरसालच्या नफ्यांतून १० टक्के नफा कमी घेण्याबद्दल दिली. आतां ही रक्कम असेसी यांच्या हातांत फायदा किंवा भांडवल यापैकीं कोणत्या रूपानें आली म्हणून समजावी व या रकमेवर इन्कमटॅक्सची आकारणी करावी किंवा कसें, असा चर्चेचा मुद्दा मुंबई हायकोर्टापुढें उपस्थित झाला होता.

प्रस्तुत केसमध्यें हायकोर्टानें आपला निर्णय दिला तो येणेंप्रमाणें:—

(१) करारामध्यें वापरलेली भाषा कोणत्याहि प्रकारची असली तरी व्यवहाराचें खरें स्वरूप शोधून काढणें हें कोर्टाचें आद्य कर्तव्य आहे.

(२) ७,५० ००० रु. ही रकम जी असेसी यांना देण्यांत आली ही खऱ्याखुऱ्या अर्थानें पाहतां असेसी यास झालेला नफाच होय. मॅनेजिंग एजंटस यांनीं कमी पगारावर काम करावें म्हणून त्यांना ही रकम आगाऊ देण्यांत आली होती, असेंहि समजण्यास हरकत नाहीं.

या रकमेवर इन्कमटॅक्सची आकारणी करण्यास हायकोर्टानें मंजुरी दिली.

कमी पगार घ्यावा म्हणून मॅनेजिंग एजंट्सना कांहीं विवक्षित रकम देण्यांत आली असल्यास या रकमेवर इन्कमटॅक्सची आकारणी करण्यांत येईल. कारण खऱ्याखुऱ्या अर्थानें पाहतां ही रकम म्हणजे मॅनेजिंग एजंटसना आगाऊ दिलेला पगारच होय.

एखाद्या कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स कंपनीला होणाऱ्या नफ्याचा कांहीं भाग ठरावाप्रमाणें घेत असतील आणि हा भाग कमी प्रमाणांत घ्यावा म्हणून कांहीं विवक्षित भरपाई म्हणून देण्यांत आली असेल तर अशा रकमेवर इन्कमटॅक्सची आकारणी होऊं शकेल.

व्यापारी मित्र, फेब्रुवारी, १९५४

---

**कच्छच्या आखाताजवळ नवें दीपगृह**— कच्छच्या आखाताजवळ उत्तर अरबी समुद्रांत एक नवीन दीपगृह बांधण्यांत येणार आहे. ह्या दीपगृहाची अखेरची योजना स्वीडिश तज्ज्ञाकडून तयार करण्यांत येत आहे. दीपगृह अगदीं आधुनिक पद्धतीचें, आणि सर्व प्रकारच्या हवामानांत उपयोगी पडेल असें बांधण्यांत येईल. खर्चाचा आकडा ६० लाखांच्या घरांत जाईल.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.